# शिर्डीची वारी

( ले. प्रभाकर जामखेडकर, मुंबई ५१)

चला चला वारी करू शिर्डीची। शिर्डीची। शिदोरी बांधू पुण्याची ॥ धृ॥
प्रभाकर सांगणार। श्रध्देच्या बळावर। चढा चढा पायरी शिर्डीची।
शिर्डीस लागला पाय। अपाय काढती मग पाय। उपाय बाबांचा हा नामी॥१॥
शिर्डी होती पुर्वी शिळधी। बुध्दीचा मेरूमणी। पुराणात कथा
ह्या क्षेत्राची ॥२॥
सागर मंथनाची जागा। रत्न वाटलेली बघा। हीच खुणगाठ बघा
शिर्डीची ॥३॥
सातशे वर्ष वय हिचे। यादवाच राज होत।
वसविली शिर्डी पुण्याची ॥ ४॥
खंडोबाचं बघा मंदिर। इथे (च) आला बाल फकिर।
तळपली ज्योति तेजाची ॥ ५॥
म्हाळसापती भक्त थोर। समाधी ह्याची म्होर।
खूण बघा अविचल निष्ठेची ॥६॥
चला बघु आता चावडी। भाग्यवान खरी कुडी।
दिवसाआड निद्रा इथे बाबांची ॥७॥
चावडी ते निंबवृक्ष। भुयार असेल एक तिथं।
बारा वर्ष तप केलं गुरूस्थानी ॥८॥
अब्दुल्लाची झोपडी बघा। खानदेशी सेवक होता।
दिक्षा दिली बाबांनी कुराणाची ॥९॥
आली आली द्वारकामाई। साऱ्या धर्मांची आई।
मशिदीत घंटा पुढे ऐकण्याची ॥१०॥
बाबांच्या इच्छेनुसार। केला तिचा जिर्णोध्दार।
प्रतिष्ठापना बाबांची ॥११॥
सुतारबंधु झटले फार। अग्रपूजेचाच मान।
मिरवणूक निघे रामनवमीची ॥१२॥
जहांगिर दारूवाला। बाबांचा भक्त झाला।
दुरूस्ती केली त्याने मंडपाची ॥१३॥
प्रधान लेडी बाग बघा। योग साधनेची जागा।
लिंबाखाली बैठक बाबांची ॥१४॥
बाबांची शिवडी उथं। स्वत: पाणी पिती (तिथं) तिथ।
तृषा भागली जीवनाची॥१५॥

नंदादीप तेवे सदा। पिंपळाला नऊ धारा।
बाबांनी फांदी ही रोवलेली ॥१६॥
दत्ताच टुमदार। छोटुकल मंदीर।
मनोहारी मूर्ति दत्ताची ॥१७॥
शांती निवासाची सोय। हेमाडपंत वाचनालय।
मंदीर सारी ग्रामदेवतांची ॥१८॥
उठा, उठा वाजे भोंगा। मंदिरात जाऊ चला।
वेळ झाली काकड आरतीची ॥१९॥
पंचामृत स्नान बघा। अभिषेक तुम्ही करा।
वेळ साधा मध्यान्न आरतीची ॥२०॥
धूपारती, शेजारती। भक्तजन ओवाळती।
साईतत्त्व पुलकित रोमांची ॥२१॥
चला पुरी झाली वारी। बाबांच्या शिर्डीची।
शिदोरी बांधली पुण्याची ॥२२॥

-x-

१९८२

[signature]